सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

वाचा :-१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१
२. प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वने, मंत्रालय यांचे कडील पत्र दिनांक ५ फेब्रुवारी२०२०
३. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे कडील पत्र क्रमांक १३७/२०१८/ FTS१०५४८ दिनांक ४ फेब्रुवारी, २०२०.

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**सातारा**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा**
**क्र.नैआ/कावि/ 806 /२०२०**
**दिनांक :-28/03/2020**

**दुरुस्ती आदेश**

ज्याअर्थी,आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.2 कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

उपोद्घात क्र.5 अन्वये, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून औद्योगिक, खाजगी आस्थापनांमधील होणारी गर्दी टाळणे आवश्यक असल्याने सातारा जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी, व सॉफ्टवेअर कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरविण्याऱ्या आस्थापना दि.31 मार्च 2020 पर्यंत पुर्णपणे बंद करण्यात आलेल्या आहेत.

सदर आदेशामधून जीवनावश्यक वस्तू, औषधे (Medicine) तयार करणाऱ्या आस्थापना, औषधे निर्माण करण्यासाठी लागणारा कच्चा माल (Raw Materials) निर्माण करणाऱ्या व इतर उपउत्पादने (By products) निर्माण करणाऱ्या , औषधाची पॅकेजिंग करणाऱ्या आस्थापना, सदर पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या वस्तूंची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, वैद्यकीय संसाधने निर्माण करणाऱ्या व त्यांच्या पॅकेजिंगसाठीची उत्पादने निर्माण करणाऱ्या, औषधे पुरवठा करणारे वितरक (Distributors), औषधांची वाहतूक करणारी वाहने (Transportation) ची आस्थापना व कंपन्याच्या मालवाहतूक सेवा व कर्मचारी वर्गाच्या बसेस व इतर वाहने सुरु राहतील. तसेच ज्या कंपनीची उत्पादन प्रक्रीया अखंडीत चालू राहणे (Continuous Processing Industry) अनिवार्य आहे. अशी आस्थाना कमीत कमी कर्मचारी वर्ग (कमाल 50%) यांचे सह चालू ठेवावी या कंपन्यांच्या माल वाहतूक सेवा व कर्मचारी वर्गाच्या बसेस अशा कंपन्या व त्यांच्या आस्थापना वगळण्यात आलेल्या आहेत.

तसेच जिल्हस्तरीय उद्योग समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सोबतच्या यादीतील कंपन्या हया Interlinking Production Chain मध्ये येत असल्यामुळे व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि. 23 मार्च 2020 च्या अधिसूचनेमधील मुद्या क्र. 7 व 9 मधील तरतुदीनुसार सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टातील उद्योग सुरु राहणार असून त्यांच्या आस्थापनावरील कर्मचारी / अधिकारी तसेच कच्चा माल व पक्कामाल वाहतूक करण्याकामी वाहनांना परवानगी देण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी
जिल्हा सातारा

**(शेखर सिंह)**
**जिल्हाधिकारी सातारा तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा.**

**प्रत — पोलीस अधिक्षक, सातारा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

c:\users\pc 9922815977\desktop\corona virus word file order vijay.docx

Scanned with CamScanner

| Sr No | Name of Units | Remarks |
|---|---|---|
| 1 | Associated Capsules (ACG) Pharmapack Pvt. Ltd. | Named as Associated Capsules (ACG) in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 2 | Associated Capsules (ACG) Capsules Pvt. Ltd. | Named as Associated Capsules (ACG) in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 3 | Associated Capsules (ACG) PAM Pharma Technologies Pvt. Ltd. | Named as Associated Capsules (ACG) in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 4 | Associated Capsules (ACG) Pharma Technologies Pvt. Ltd. | Named as Associated Capsules (ACG) in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 5 | Meditab Specialities Pvt. Ltd. | Named as Medistab & Medispray in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 6 | Medispray Laboratories Pvt. Ltd. | Named as Medistab & Medispray in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 7 | Garware Bestretch Limited | Named as Garware Pharmaceuticals in Main List-Order, Dated 26-03-2020 |
| 8 | Nipro India Corporation Private Limited | Named as Nipro in Main List- Order, Dated 26-03-2020 |
| 9 | Zenith Micro Control | Named as Zenith Pharma in Main List- Order, Dated 26-03-2020 |
| 10 | H.B.Fuller India Adhesives Pvt. Ltd | Named as HB Fuller India Adhesives Pvt Ltd in Main List- Order, Dated 26-03-2020 |
| 11 | General Rubber Products | |
| 12 | Vaishvik Foods | |
| 13 | Datwyler Pharma Packaging India Pvt. Ltd. | |

जिल्हाधिकारी सातारा

Scanned with CamScanner